# एक – अनेक

व्यासांपासून आईन्स्टाईन पर्यंत
शास्त्रज्ञ सारे धर्मज्ञ नि पंडीत
युगे युगे आहेत आले सांगत
अनेकच एक एकच अनेकात

असा आस्तिक किंवा नास्तिक
म्हणा निसर्ग अथवा देव
आहे ना परी शक्ती ती एक
घडवी जी वा मोडी हे विश्व

नष्ट न होई आत्मा सांगे धर्मज्ञ
सोडी काया एक शिरे दुसरीत
नष्ट न होई ऊर्जा सांगे शास्त्रज्ञ
म्हणती ऊर्जा होते रूपांतरीत

त्याच शक्तीची रूपे अनेक
सजीव निर्जीव वा चराचर
असो प्राणिमात्र वा वस्तुजात
व्याप्त असे रूप तिचे सर्वात

तनात धग मनात रग
कायेत शक्ती बुद्धीत स्फूर्ती
दृश्य अदृश्याचा असा मेळ
अस्तित्व नस्तित्वाचा एक खेळ

– नारायण
०७/२२/२३